आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३१ मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघामध्ये मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

- महाराष्ट्रात निवडणुकीची मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असली, तरी आदर्श आचारसंहिता अद्याप लागू राहणार असल्याचं निवडणूक आयोगाचं स्पष्टीकरण

- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाला आज पासून प्रारंभ

**आणि**

- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरीत भारताच्या त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीचा उपान्त्य फेरीत प्रवेश

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघामध्ये उद्या, शनिवारी मतदान होणार आहे. मतदानाच्या दृष्टीनं प्रशासन सज्ज होत आहे. सर्व मतदारसंघांमधे मतदान य़ंत्र आणि मतदान साहित्य घेऊन नियुक्त कर्मचारी मतदानकेंद्राकडे रवाना झाले आहेत. उष्णतेच्या लाटेची स्थिती लक्षात घेऊन मतदान केंद्रांवर पिण्य़ाचं पाणी, सावली, स्वच्छतागृहं, चाकाच्या खुर्च्या, इत्यादी सुविधा उपलब्ध करुन द्याव्या असं निवडणूक आयोगानं सर्व राज्य निवडणूक कार्यालयांना सांगितलं आहे. ठिकठिकाणी पोलीस आणि इतर सुरक्षा दलांचा

बंदोबस्त आहे. या टप्प्यात उत्तर प्रदेश आणि पंजाबातल्या प्रत्येकी १३, पश्चिम बंगालमधल्या ९, बिहारच्या ८, ओडिशात ६, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडमधल्या ३ आणि चंदीगडच्या एका जागेचा समावेश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांच्यासह एकूण ९०४ उमेदवारांचं भवितव्य उद्या मतदान यंत्रात बंद होईल.

ओदिशा विधानसभेच्या ४२ जागांसाठी देखील उद्या मतदान होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होणार आहे. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजीच होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी मात्र २ जून रोजी होणार आहे.

**<><><><><>**

मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाल्याची चर्चा अफवा निराधार असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. याचं खंडन करत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आकाशवाणीला सांगितलं की, मतदानाची टक्केवारी कोणीही वाढवू शकत नाही, तसंच किती मतदान झालं यांची नोंद असलेल्या फॉर्म १७ C ची प्रत उमेदवार आणि प्रतिनिधींना देण्यात आलेली आहे. मतदारांच्या मतदानाची माहिती आणि ईव्हीएमची सर्व माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अद्ययावत केल्याचंही राजीव कुमार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची सर्व टप्प्यातली मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असली; तरी आदर्श आचारसंहिता अद्याप लागू आहे; त्यात

कोणत्याही प्रकारची शिथिलता देण्यात आलेली नाही, असं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे. निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचं या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी कन्याकुमारी इथल्या स्वामी विवेकानंद स्मारकात ध्यानधारणा सुरू केली. ध्यानधारणेला सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी भगवती अम्मन मंदिरात दर्शन घेतलं . एक जूनला म्हणजे उद्या विवेकानंद स्मारकाजवळच्या तिरुवल्लुवर यांच्या १३३ फूट उंच पुतळ्याला मोदी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतील आणि त्याच दिवशी ते त्रिवेंद्रममार्गे दिल्लीला पोहोचणार आहेत. दरम्यान मोदी यांच्या दौऱ्यामुळं किनारपट्टीच्या भागात तसंच सागरी सुरक्षा कडक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी आज कुटुंबियांसह तिरुपती मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. यावेळी तिरुमाला तिरुपती देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी धर्मा रेड्डी, मुख्य पुजारी आणि अन्य अधिकाऱ्यांनी शाह यांचं स्वागत केलं. त्यानंतर शाह यांनी कुटुंबियांसमावेत श्रीव्यंकटेश्वराचं दर्शन घेतलं.

दुपारनंतर अमित शाह राजकोटला जाणार असून तत्पूर्वी ते सोमनाथ मंदिरात जाऊन दर्शन घेणार आहेत.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाला आज पासून प्रारंभ झाला. अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात विविध कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अहिल्याबाई होळकरांना समाज माध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. मुंबईच्या अहिल्याबाई होळकर चौकात आज त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. मध्यप्रदेशात त्रिशताब्दी वर्ष साजरं करण्यासाठी विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं १९९१ नंतर पहिल्यांदाच ब्रिटनवरून १०० टनापेक्षा जास्त सोनं आपल्या तिजोरीत स्थलांतरित केलं आहे. सोन्यासारखा मौल्यवान धातूची इतक्या मोठ्या प्रमाणावर भर तिजोरीत पडण्याची ही पहिलीच वेळ आहे. येत्या काळात इतक्याच प्रमाणात सोनं देशात आणलं जाणार असल्याची माहिती काल सूत्रांनी दिली. गेल्या काही काळापासून रिझर्व्ह बँकेनं सोनं खरेदी करायला सुरुवात केली होती. हे सोनं परदेशात जमा होत होतं. आता त्यापैकी काही सोनं भारतात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बँक ऑफ इंग्लंडमध्ये अनेक देशांच्या केंद्रीय बँकांचा सुवर्णसाठा मोठ्या काळापासून ठेवला जातो.

**<><><><><>**

मध्य रेल्वेच्या सीएसएमटी आणि ठाणे स्थानकात ६३ तासांच्या विशेष मेगाब्लॉकचा परिणाम रेल्वेसेवेवर झाला असून चाकारमान्यांना अडचणींना सामोरं जावं लागत आहे. मुंबईत गुरुवारी मध्यरात्रीपासून तीन दिवस ९५३ लोकल आणि ७२ मेल एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. या ब्लॉकदरम्यान पर्यायी व्यवस्था

म्हणून एसटी महामंडळाने आणखी ५० बसेस चालवण्याचा निर्णय घेतला आहे. सीएसएमटी ते ठाणे स्थानकादरम्यान धीम्या मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, ते लवकरच पूर्ण होईल. प्रवाशांनी सहकार्य करण्याचे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

<><><><>

छत्तीसगडमधे सुरक्षा दलांनी विजापूर जिल्ह्यातल्या विविध ठिकाणांहून सोळा माओवाद्यांना अटक केली आहे. यापैकी अकरा जणांना गोरना पडियारपारा परिसरातून, तर पाच जणांना भुसापूर परिसरातून अटक करण्यात आली. सुरक्षा दलांच्या हालचाली रोखण्यासाठी अडथळे निर्माण करणं आणि स्फोट घडवून आणणं अशा घटनांमध्ये सहभागाचा आरोप त्यांच्यावर असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष जो बायडन यांनी युक्रेनला रशियाच्या अंतर्भागांवर आणि त्यांना दिलेल्या शस्त्रांचा वापर करण्याची परवानगी दिली आहे. अमेरिकेनं युक्रेनला दिलेल्या शस्त्रात्रांचा वापर स्व-संरक्षणासाठी करण्याची परवानगी होती. परंतु युक्रेनच्या पूर्व खार्किव प्रदेशासह रशियाजवळील सीमावर्ती भागात बिघडलेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी अमेरिकेनं ही परवानगी दिल्याचं वृत्त आहे.

दरम्यान, अमेरिकेनं रशियाच्या अंतर्भागांत हल्ला करण्याचं धोरण आणि त्यावेळी युक्रेननं अमेरिकन शस्त्रास्त्रांचा वापर न करण्याबाबतच्या नियमात कोणताही बदल केलेला नाही.

<><><><>

शारजाह वाणिज्य आणि उद्योग मंचातर्फे "शारजाह-इंडिया बिझनेस फोरम" चं आयोजन केलं होतं. ज्यामध्ये फिनटेक, कृषी, आरोग्यसेवा, माहिती आणि तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि रासायनिक उत्पादन यासारख्या धोरणात्मक क्षेत्रातल्या ६०० हून अधिक कंपन्या सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

लैंगिक छळ केल्याचा आरोप असलेले प्रज्वल रेवण्णा यांना आज पहाटे केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन अटक करण्यात आली. इंटरपोलनं दिलेल्या माहितीनुसार कर्नाटक पोलीसांचं विशेष तपास पथक, बेंगलूरू पोलीस आणि विमानतळ प्राधिकरण यांनी रेवण्णा यांना अटक करण्याची तयारी केली होती. महिलांचा लैंगिक छळ करून धमकी दिल्याचा आरोप रेवण्णा यांच्यावर आहे, याप्रकरणाची विशेष तपास पथकाद्वारे चौकशी होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरीत भारताच्या त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. आज झालेल्या उपान्त्य पूर्व फेरीच्या सामन्यात त्यांनी कोरियाच्या किम सो युंग आणि काँग ही युंग या जोडीचा १८-२१, २१-१९, २४-२२ असा पराभव केला.

दरम्यान, या स्पर्धेतलं महिला आणि पुरुष एकेरीतलं भारताचं आव्हान संपुष्टात आलं. काल झालेल्या उप-उपांत्यपूर्व फेरीत पी व्ही सिंधू आणि एच एस. प्रणॉय यांना पराभवाचा सामना करावा लागला.

**<><><><><>**

भारतीय ग्रांप्री स्पर्धेत पुरुष पोल वॉल्ट मध्ये तामिळनाडूच्या के आर. युगेंद्रन ने काल सुवर्णपदक जिंकलं. तर महिलांच्या पोल व्हॉल्ट स्पर्धेत  केरळच्या मारिया

जेसन आणि तामिळनाडूच्या बारनिका एलांगोवन आणि पवित्रा व्यंकटेश यांच्यात लढत झाली.

**<><><><><>**

नाटो संघटनेच्या सदस्य देशांनी युक्रेनला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यासंदर्भात जुलै महिन्यात वॉशिंग्टनला शिखर बैठक होणार आहे. त्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी पॅराग्वेत दोन दिवसांची अनौपचारिक बैठक होणार आहे.

**//<><><><><>//**